परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Phone: (020) 2562 1398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा/अभि./ ३६४ दिनांक: २८/०२/२०२५

प्रति
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा)

**विषय : अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाशी संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत....**

संदर्भ : परिपत्रक क्र. ३८/२०२५ (जा.क्र.सीबी/३४, दिनांक २२/०२/२०२५)

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकान्वये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२४ परीक्षेमध्ये प्रथम वर्ष अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरिता, द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरिता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२३–२४ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२३–२४) च्या परीक्षांच्या निकाला ऐवजी विषम सत्र २०२४–२५ (म्हणजे हिवाळी परीक्षा २०२४–२५) च्या निकालांवर देण्यात आलेली आहे.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये वरीलप्रमाणे प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेश देण्यात आलेला असून हिवाळी २०२४ मध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे पुढील वर्षामध्ये प्रवेश घेतल्याचे महाविद्यालयाचे पत्र, प्रवेश शुल्काची पावती, परिपत्रक क्र. ३८/२०२५ प्रमाणे पात्र विद्यार्थ्यांने महाविद्यालयास सादर केलेल्या हमी पत्राची प्रत ही सर्व माहिती **दिनांक ०१/०३/२०२५ ते दिनांक ०७/०३/२०२५** पर्यंत https://examinward.unipune.ac.in/ExamformOnline/auth/login_college.aspx या लिंकवर भरण्यात यावी. जेणेकरुन संबंधित पात्र विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षा २०२५ करिताचे परीक्षा आवेदन अर्ज भरताना समस्या निर्माण होणार नाही.

खालील तक्त्यानुसार विद्यार्थी पात्र राहतील:

**1) FE To TE**

| प्रथम वर्ष (FE) | व्दितीय वर्ष (SE) | तृतीय वर्ष (TE) |
|---|---|---|
| Passed in OCT-2024 | Minimum 50% Credits in APRIL-2024 | Eligible to Carry on **Sem 5th & 6th** |

**2) SE To BE**

| द्वितीय वर्ष (SE) | तृतीय वर्ष (TE) | चतुर्थ वर्ष (BE) |
|---|---|---|
| Passed in OCT-2024 | Minimum 50% Credits in APRIL-2024 | Eligible to Carry on **Sem 7th & 8th** |

सदर कॅरीऑन सुविधा अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिताच लागू राहील व या निर्देशांचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी, तसेच कोणताही पात्र विद्यार्थी कॅरी ऑन संधीपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण दक्षता घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. प्रभाकर देसाई)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे.